## प्रताप महाविद्यालय (स्वायत्त), अमळनेर जि. जळगाव

## शै.वर्ष -२०२४ -२०२५

# राष्ट्रीय सेवा योजना

## वार्षिक अहवाल

कार्यक्रम अधिकारी
प्रा डॉ. हेमंत पवार

प्राचार्य,
प्रा डॉ ए बी जैन

राष्ट्रीय सेवा योजना विभाग - उपक्रम अहवाल

प्रस्तावना : प्रताप महाविद्यालय, अमळनेर (स्वायत्त) येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत विविध समाजोपयोगी, राष्ट्रीय मूल्यांवर आधारित, पर्यावरणपूरक, आरोग्यविषयक व जनजागृतीपर उपक्रम अत्यंत यशस्वीरित्या राबविण्यात आले. या सर्व उपक्रमांचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, सेवाभाव, राष्ट्रप्रेम, आरोग्य जागृती, संविधानाचे मूल्य, निवडणूक साक्षरता, पर्यावरण संवर्धन व स्वच्छता यांसारख्या मूलभूत गुणांचे बळकटीकरण करण करणे हा होता.

१. २४ मे २०२४ - श्री साखरराम महाराज यात्रा व स्वच्छता अभियान: केबीसी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव व प्रताप महाविद्यालय, अमळनेर यांच्या संयुक्त विद्यमाने अमळनेर येथे पार पडणाऱ्या श्री संत साखरराम महाराज यात्रा महोत्सवात NSS स्वयंसेवकांनी सक्रीय सहभाग घेतला. यात्रा मार्गावर प्लास्टिक कचरा व इतर कचरा गोळा करून परिसर स्वच्छ ठेवण्याचे काम त्यांनी केले. या उपक्रमामुळे पर्यावरण व समाजभान या दोन्ही बाबींची जाणीव विद्यार्थ्यांना झाली.

२. २१ जून २०२४ - आंतरराष्ट्रीय योग दिन: या दिवशी महाविद्यालयात योग प्रशिक्षण सत्राचे आयोजन करण्यात आले. योग प्रशिक्षिका प्रा. अर्चना पाटील यांनी विद्यार्थ्यांना प्राणायाम, सूर्यनमस्कार, विविध योगासने शिकविली. योगसाधनेचे मानसिक व शारीरिक आरोग्यावरील फायदे विषद करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन डॉ. हेमंत

पवार व डॉ. सचिन पाटील यांनी केले. अनेक स्वयंसेवकांनी नियमित योग करण्याचा संकल्प यावेळी घेतला.

३. २३ जून २०२४ - वारी पालखी सोहळ्यात सहभाग: श्री संत साखराराम महाराज यांच्या पालखी सोहळ्यात NSS स्वयंसेवकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. अमळनेर ते पंढरपूर या पायी वारीत सहभाग घेऊन त्यांनी भाविकांची सेवा केली तसेच श्रमदान केले. पालखी मार्गावरील स्वच्छता राखणे, पाण्याचे वाटप, प्लास्टिक गोळा करणे यासारख्या उपक्रमांमध्ये त्यांनी योगदान दिले. “सेवा हीच खरी वारी” या भावनेने प्रेरित होऊन हा उपक्रम अत्यंत यशस्वी ठरला.

४. १२ ऑगस्ट २०२४ - "नशा मुक्त भारत" अभियान: महाविद्यालयीन स्तरावर 'नशा मुक्त भारत' अभियान अंतर्गत प्रतिज्ञा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्तीची प्रतिज्ञा घेऊन समाजात नशा विरुद्ध जनजागृती करण्याचा निर्धार व्यक्त केला. कार्यक्रमास प्राचार्य डॉ. ए. बी. जैन, प्रा. डॉ. धीरज वैष्णव, प्रा. डॉ. अमित पाटील, प्रा. के. जी. मोरे, प्रा. भाग्यश्री जाधव आणि अनेक प्राध्यापक व स्वयंसेवक उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. डॉ. हेमंत पवार यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. सुनील राजपूत यांनी केले.

५. १४ ऑगस्ट २०२४ - 'हर घर तिरंगा' अभियान: स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त महाविद्यालयात प्रभात फेरी आणि तिरंगा वितरण कार्यक्रम संपन्न झाला. प्राचार्य

डॉ. ए. बी. जैन यांनी उपस्थितांना तिरंगा वितरित करून राष्ट्रध्वजाच्या सन्मानाचे महत्त्व अधोरेखित केले. यामध्ये NSS, NCC आणि क्रीडा विभागाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

६. १५ ऑगस्ट २०२४ - "एक पेड माँ के नाम" वृक्षारोपण उपक्रम: स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने पर्यावरण संरक्षण व मातृसन्मानासाठी 'एक पेड माँ के नाम' हा उपक्रम राबवण्यात आला. महाविद्यालयाच्या परिसरात विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. प्रत्येक वृक्ष एका मातेला समर्पित करण्यात आला. उपस्थित मान्यवरांमध्ये डॉ. संदेश गुजराथी, बजरंग अहवाल, योगेश मुंदडे इत्यादींचा समावेश होता.

७. २९ ऑगस्ट २०२४ - रक्तदान शिबिर: लायन्स क्लब अमळनेरच्या सहकार्याने आयोजित या शिबिरात ३० पेक्षा अधिक स्वयंसेवकांनी रक्तदान केले. अध्यक्षस्थानी डॉ. संदेश गुजराथी होते. कार्यक्रमाचे आयोजन NSS कार्यक्रम अधिकारी डॉ. हेमंत पवार, डॉ. सुनील राजपूत व प्रा. भाग्यश्री जाधव यांनी केले.

८. २३ सप्टेंबर २०२४ - राष्ट्रीय सेवा योजना दिन: राष्ट्रीय सेवा योजना दिनाचे औचित्य साधून विशेष व्याख्यान व श्रमदान उपक्रम आयोजित करण्यात आला. प्राचार्य डॉ. जैन यांनी "सेवाच खरा राष्ट्रधर्म" या संकल्पनेवर प्रभावी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आयोजन डॉ. सचिन नांद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली झाले.

९. २६ नोव्हेंबर २०२४ - संविधान दिन: भारतीय राज्यघटनेच्या अंगीकाराचा दिन म्हणून NSS विभागाने 'संविधान दिन' मोठ्या उत्साहात साजरा केला. यावेळी संविधानातील मूल्ये, मूलभूत हक्क व कर्तव्यांवर आधारित मार्गदर्शनपर कार्यक्रम घेण्यात आले.

१०. ०२ डिसेंबर २०२४ - 'My Bharat' पोर्टल जनजागृती: NSS विभागाच्या वतीने युवकांमध्ये 'My Bharat' पोर्टलवरील नोंदणी व प्रश्नमंजुषा स्पर्धेसाठी प्रचार मोहीम राबवण्यात आली. या उपक्रमात डॉ. सचिन नांद्रे (संचालक, NSS, KBCNMU, जलगाव) व कार्यक्रम अधिकारी डॉ. हेमंत पवार यांच्या मार्गदर्शनाखाली स्वयंसेवकांनी सक्रीय सहभाग नोंदवला.

११. २५ जानेवारी २०२५ - मतदार जागरूकता अभियान: राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयाच्या दत्तक गाव चिमनपुरी पिंपळे येथे "वोटर रेलीबाज" व मतदार जनजागृती सादरीकरणाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी मतदानाचे महत्त्व प्रबोधनात्मक नाट्याद्वारे मांडले.

१२. २४ फेब्रुवारी २०२५ - नेत्रदान जनजागृती शिबिर: स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त NSS विभागाच्या वतीने विशेष नेत्रदान जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे नेतृत्व NSS कार्यक्रम अधिकारी डॉ. हेमंत

पवार व प्राचार्य डॉ. ए. बी. जैन यांनी केले. स्वयंसेवकांनी नेत्रदानाचे महत्त्व समजून घेत समाजात जनजागृती घडवण्याचा निर्धार केला.

रासेयो **कार्यक्रम अधिकारी**

**प्रा डॉ हेमंत. जी. पवार**

**प्राचार्य,**

**प्रा. डॉ .ए. बी. जैन**

| Sr. No. | Date | Event Title |
|---|---|---|
| 1 | 24/05/2024 | Shri Sakharam Maharaj Yatra and Cleanliness Campaign |
| 2 | 21/06/2024 | International Yoga Day |
| 3 | 23/06/2024 | Participation in Wari Palakhi Procession |
| 4 | 12/08/2024 | 'Nasha Mukt Bharat' Campaign |
| 5 | 14/08/2024 | 'Har Ghar Tiranga' Campaign |
| 6 | 15/08/2024 | "Ek Ped Maa Ke Naam" Tree Plantation Drive |
| 7 | 29/08/2024 | Blood Donation Camp |
| 8 | 23/09/2024 | NSS Day Celebration and Shramdan |
| 9 | 26/11/2024 | Constitution Day Celebration |
| 10 | 02/12/2024 | Awareness Campaign for 'My Bharat' Portal Registration |
| 11 | 25/01/2025 | Voter Awareness Rally and Street Play at Chimanpuri Pimpale |
| 12 | 24/02/2025 | Eye Donation Awareness Camp on Veer Savarkar Punyatithi |